## सुविचार

जो दुसऱ्याची निंदा आपल्या जवळ येऊन करतो, तोच माणूस आपल्या पाठीमागे तिसऱ्याजवळ आपलीही निंदा करतो, हे लक्षात ठेवावे. गोड बोलण्यावर विश्वास ठेवण्याऐवजी त्यांच्या स्वभावाची ओळख करून घ्यावी.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### 7,438 उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये

**मुंबई :** राज्यातील 12 जिल्हा परिषद व 125 पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदान शांततेत पार पडले. सरासरी 62 टक्के मतदानाची नोंद झाली असून 7,438 उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री दत्तात्रय भरणे व हसन मुश्रीफ यांनी मतदानाचा हक्क बजावला. काही ठिकाणी ईव्हीएम बिघाड, बोगस मतदारांचे आरोप व विकासकामांअभावी गावांचा बहिष्कार अशी किरकोळ प्रकरणे घडली. निकाल 9 फेब्रुवारीला जाहीर होणार आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ०८ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पाकिस्तानची आयसीसीने जिरवली

**मुंबई:** 2026 च्या टी-20 विश्वचषकात भारत-पाकिस्तान सामना होणार की नाही, याबाबत संभ्रम कायम आहे. पाकिस्तान सरकारने 15 फेब्रुवारीला त्यांचा संघ भारताविरुद्ध खेळणार नसल्याची भूमिका जाहीर केली, मात्र स्पर्धेत सहभाग राहील असे स्पष्ट केले. पीसीबीने 'असाधारण परिस्थिती'चा उल्लेख करत आयसीसीशी औपचारिक संवाद साधण्याची विनंती केली आहे. दरम्यान, आयसीसीने भारताशी न खेळल्यास निर्बंध व कायदेशीर कारवाईचा इशारा देत नेमक्या परिस्थितीचे स्पष्टीकरण मागितले आहे.

### शंभर टक्के मतदान बहिष्कार

**सांगली :** लोकशाहीच्या उत्सवात प्रत्येक मतासाठी उमेदवार धडपडत असताना तासगाव तालुक्यातील बलगवडे ग्रामस्थांनी अनोखा इतिहास घडवला. पर्यावरण संरक्षण व स्थानिक हक्कांच्या मागण्यांसाठी सुमारे 2,300 मतदार असलेल्या गावाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवर शंभर टक्के बहिष्कार टाकला. सकाळपासून मतदान संपेपर्यंत एकही मत नोंदले गेले नाही. या अभूतपूर्व निर्णयामुळे प्रशासनात खळबळ उडाली असून अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

### भारत-अमेरिका व्यापार कराराचा शेतीवर परिणाम

**नवी दिल्ली:** भारत-अमेरिका व्यापार करारातून शेती, पोल्ट्री आणि डेअरी क्षेत्राला वगळण्याची घोषणा केंद्राने केली असली, तरी काही कृषी संबंधित वस्तूंवरील आयात सवलती जाहीर झाल्या आहेत. सुकामेवा, ताजी व प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल, वाइन, पशुखाद्य धान्ये, मक्याचा भुस्सा, सोयाबीन पेंड आणि लाल ज्वारी यांची शुल्कमुक्त किंवा कमी दराने आयात होणार आहे.

### सुनेत्रा पवारांच्या शपथविधीवरून रामदास कदम यांचे सुनील तटकरेंवर गंभीर आरोप

# महायुतीत वादाच्या ठिणग्या!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. त्यांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांतच पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा आणि टीकेची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंवर थेट आणि तीव्र आरोप करत महायुतीतील अंतर्गत मतभेद उघड केले आहेत.

रामदास कदम यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, अजित पवार यांच्या निधनाला 72 तासही उलटले नव्हते, तोच सुनेत्रा पवार यांचा शपथविधी घडवून आणण्यात आला. "दादांच्या चितेची राखही शांत झाली नव्हती, तरीही शपथविधीची घाई का करण्यात आली?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, शरद पवार यांना राजकीय शह देण्यासाठी हा शपथविधी मुद्दाम घडवून आणण्यात आला.

कदमांनी तटकरेंवर "अत्यंत गलिच्छ राजकारण" केल्याचा आरोप करत, सुनेत्रा पवार यांना सुतक पाळण्याची संधीही दिली गेली नाही, अशी टीका केली. "ज्या माउलीचे कुंकू गेले, त्यांना काही दिवसांचीही उसंत न देता मुंबईत आणून शपथ घ्यायला लावणे योग्य नव्हते," असे ते म्हणाले. शपथविधी दहा दिवसांनंतर झाला असता तर काही बिघडले नसते, असेही त्यांनी नमूद केले. या टीकेत कदमांनी वैयक्तिक राजकीय अनुभवांचाही उल्लेख केला. "ज्यांनी मला आणि माझ्या मुलाला राजकारणात अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला, त्यांच्याकडून काहीही अपेक्षित आहे," असे म्हणत त्यांनी सुनील तटकरेंवर विश्वासघाताचा आरोप केला. लोकसभा निवडणुकीत तटकरेंना विजयी करण्यासाठी आम्ही प्रयत्न केले; मात्र विधानसभेच्या वेळी त्यांनीच पाठ फिरवली, असा दावा त्यांनी केला.

कदमांच्या या वक्तव्यामुळे महायुतीतील घटक पक्षांमध्ये तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महायुतीत एकत्र सत्तेत असतानाही अशा स्वरूपाच्या सार्वजनिक टीकेमुळे आघाडीतील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून या आरोपांवर अधिकृत प्रतिक्रिया अद्याप आलेली नाही. तथापि, राज्यातील बदलत्या राजकीय परिस्थितीत सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीभोवतीचे राजकारण पुढील काही दिवसांत आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## एकनाथ खडसेंना कोर्टाने बजावले अजामीनपात्र वॉरंट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुण्यातील बहुचर्चित भोसरी जमीन खरेदी प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी महसूल मंत्री एकनाथ खडसे यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. मुंबईतील विशेष एमपी-एमएलए न्यायालयाने एकनाथ खडसे आणि त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. न्यायालयाने दिलेला हा दणका खडसे कुटुंबासाठी धक्का मानला जात आहे. भोसरी येथील एमआयडीसीच्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप खडसे यांच्यावर आहे. या प्रकरणी ईडीने तपास करून खडसे दाम्पत्य आणि त्यांचे जावई गिरीश चौधरी यांच्यासह अन्य काही कंपन्यांविरुद्ध सुमारे एक हजार पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. या सर्वांवर मनी लॉँड्रिंगचे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. यापूर्वी न्यायालयाने खडसे यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळून लावला होता, त्यामुळे त्यांच्यावरील आरोप निश्चित होतील असे मानले जात होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होणार होती. यावेळी न्यायालयाकडून खडसे यांच्यावर आरोप निश्चित केले जाणार होते. मात्र, सुनावणी दरम्यान एकनाथ खडसे आणि मंदाकिनी खडसे हे दोघेही न्यायालयात गैरहजर राहिले. या अनुपस्थितीची गंभीर दखल घेत विशेष न्यायालयाने त्यांच्या विरोधात थेट अजामीनपात्र वॉरंट बजावले आहे.

## तिरुपती लाडू वाद पुन्हा पेटला

### 'बाथरूम क्लिनर' रसायन वापरले, नायडूंचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**अमरावती :** आंध्र प्रदेशातील तिरुमला तिरुपती देवस्थान (TTD) येथे प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या लाडूंवरील भेसळीचा वाद पुन्हा तीव्र झाला आहे. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी सार्वजनिक कार्यक्रमात बोलताना लाडू तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपात "बाथरूम स्वच्छ करण्यासाठी वापरले जाणारे रसायन" मिसळल्याचा गंभीर आरोप केला.

या दाव्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून विरोधकांनी आरोप फेटाळले आहेत. यापूर्वीही प्रसादाच्या तुपात भेसळ झाल्याच्या तक्रारींवर चौकशी सुरू होती. विशेष तपास पथकाने (SIT) 2019 ते 2024 दरम्यान तुपाच्या खरेदी प्रक्रियेत नियमभंग व अनियमितता झाल्याचे निदर्शनास आणले होते. SIT च्या निष्कर्षानुसार, काही पुरवठादारांकडून दिलेल्या तुपाच्या नमुन्यांमध्ये भेसळ असल्याची प्रयोगशाळेने पुष्टी केली होती; मात्र त्या अहवालांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले. नायडू यांच्या नव्या दाव्यामुळे भक्तांमध्ये संताप व्यक्त होत असून प्रकरणाची सखोल व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी वाढली आहे. राज्य सरकारने दोषींवर कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

### सुनील तटकरे यांचे संकेत – सुनेत्रा पवारांसोबत बैठकीत सखोल चर्चा होणार

# राष्ट्रवादी विलीनीकरणावर नव्या चर्चांना वेग!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यातील राजकीय घडामोडींमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा एकदा वेग आला आहे. वरिष्ठ नेते सुनील तटकरे यांनी दिलेल्या सूचनांमुळे या विषयावर नव्याने चर्चा सुरू झाली असून, येत्या 10 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना तटकरे म्हणाले की, पक्षातील विविध स्तरांवर विलीनीकरणाबाबत वेगवेगळ्या भूमिका मांडल्या जात आहेत. अंतिम निर्णय मात्र सर्व संबंधित नेत्यांशी सखोल चर्चा करूनच घेतला जाईल. 10 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहणार असून, त्यावेळी विलीनीकरणाच्या मुद्द्यावर प्राथमिक स्तरावर चर्चा होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

तटकरे यांनी स्पष्ट केले की, पूर्वी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय सामूहिक पद्धतीने घेण्यात आला होता. सध्याच्या राजकीय परिस्थितीत पक्ष संघटनात्मकदृष्ट्या अधिक बळकट होण्यासाठी कोणते पर्याय योग्य ठरतील, याचा सर्वंकष आढावा घेतला जाईल. योग्य वेळ आल्यावर सर्व घटकांशी संवाद साधून एकमताचा निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, अजित पवार यांच्याशी संबंधित कथित विमान अपघाताबाबत विविध स्तरावर शंका उपस्थित केल्या जात असल्याच्या पार्श्वभूमीवर या घटनेची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी तटकरे यांनी पुन्हा अधोरेखित केली. तपास यंत्रणांनी उपलब्ध तांत्रिक पुरावे, ब्लॅक बॉक्ससह सर्व बाबींचा तपशीलवार अभ्यास करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या संदर्भात शंका व्यक्त करणाऱ्या व्यक्तींशीही चौकशी संस्थांनी संपर्क साधावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तटकरे यांच्या विधानानंतर दोन्ही राष्ट्रवादी गटांतील नेत्यांच्या भूमिकांवर पुन्हा चर्चेची झळाळी आली आहे. काही नेते विलीनीकरणाबाबत सावध भूमिका घेत असल्याचे संकेत मिळत असताना, दुसऱ्या बाजूला संघटनात्मक एकजुटीच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते.

येत्या काही दिवसांत होणाऱ्या बैठका आणि वरिष्ठ नेत्यांमधील चर्चांनंतर विलीनीकरणाबाबत ठोस दिशा मिळू शकते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे 10 फेब्रुवारीची बैठक आणि त्यानंतरचे निर्णय राष्ट्रवादीच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी निर्णायक ठरू शकतात, असे जाणकारांचे मत आहे.

# संघाला सत्ता नव्हे, समाजसंघटन महत्त्वाचे!

### संघाच्या शताब्दी कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवतांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) स्थापनेला 100 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांनी संघाच्या कार्यपद्धती, उद्दिष्टे आणि हिंदू धर्माविषयी सविस्तर विचार मांडले. या वेळी त्यांनी संघाचे कार्य समाजसंघटनावर केंद्रित असून सत्ता किंवा लोकप्रियतेची अपेक्षा संघाला नसल्याचे स्पष्ट केले.

भागवत म्हणाले की, संघाचे काम अनोखे असून जगभरात अशा प्रकारे समाजाला एकत्रित करण्याचे कार्य क्वचितच दिसते. संघाचे ध्येय समाजाला संघटित करणे हेच आहे आणि त्यापलीकडे संघाची कोणतीही राजकीय किंवा सत्ताकेंद्रित महत्त्वाकांक्षा नाही. देशाच्या भल्यासाठी जे काम सुरू आहे, ते सुरळीतपणे पार पडावे, यासाठी संघ कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. राजकीय संदर्भात बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख करत, मोदी यांचा पक्ष हा संघापासून स्वतंत्र आहे, असे स्पष्ट केले. संघाला कोणत्याही संस्था किंवा पक्षाशी स्पर्धा करायची नसून, कोणाचा विरोध न करता आपले कार्य शांतपणे चालू ठेवणे हीच संघाची भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. संघात व्यवहार, स्वार्थी देवाणघेवाण नसून आपुलकीच्या भावनेतून कार्य होत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. हिंदू धर्माविषयी बोलताना भागवत यांनी भारताचा सनातन स्वभाव कायम राहील, असे मत व्यक्त केले. ऋषी-मुनींच्या परंपरेनुसार सर्व समाजघटक आपलेच असून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची संस्कृती भारतात आहे, असे त्यांनी सांगितले. सृष्टीच्या आरंभीपासून धर्म अस्तित्वात असल्याचा उल्लेख करत, सामाजिक समन्वय आणि सहअस्तित्व यावर त्यांनी भर दिला. तसेच भारतातील विविध समुदायांबाबत बोलताना मुस्लीम आणि ख्रिश्चन हेही भारताचेच नागरिक असल्याचे नमूद केले.

### बीएमसीत 16 फेब्रुवारीला विरोधी पक्षनेता नेमणार

**मुंबई :** महापालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला असून पुढील काही दिवसांत महत्त्वाच्या पदांसाठी निवड प्रक्रिया होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 16 फेब्रुवारीला विरोधी पक्षनेत्याची निवड होईल, तर 20 फेब्रुवारीला स्थायी समिती अध्यक्ष नेमला जाणार आहे. 23 फेब्रुवारीला सुधार आणि बेस्ट समिती सदस्यांची निवड होणार असून 25 फेब्रुवारीला इतर समित्यांचे अध्यक्ष ठरवले जातील. या सर्व समित्या महापालिकेच्या प्रशासनात निर्णायक भूमिका बजावतात. दरम्यान, पालिकेचा अर्थसंकल्प मार्चमध्ये सादर होण्याची शक्यता असून आर्थिक नियोजनासाठी या नियुक्त्या महत्त्वाच्या ठरणार आहेत.

## बीड जिल्ह्यातील संत-महंतांकडून बारामतीत पवार कुटुंबीयांचे सांत्वन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** दिवंगत लोकनेते अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्यभरातून शोकभावना व्यक्त होत असताना बीड जिल्ह्यातील संत-महंतांनी बारामती येथे जाऊन पवार कुटुंबीयांचे सांत्वन केले. विद्या प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात स्व. अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी खासदार शरदचंद्र पवार, पार्थ पवार, जय पवार तसेच बीड येथील नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज उपस्थित होते.

अजित दादा पवार यांच्या निधनामुळे जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण राज्याचे मोठे नुकसान झाल्याची भावना संत-महंतांनी व्यक्त केली. दिलेला शब्द पाळणारे, जनतेच्या प्रश्नांवर तत्परतेने काम करणारे आणि कार्यकर्त्यांशी घट्ट नाते ठेवणारे नेतृत्व म्हणून दादांची ओळख होती. या वेळी नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, नेकनूर येथील बंकट स्वामी महाराज मठाचे महंत मेंगडे महाराज, आईसाहेब संस्थान महासांगवी (ता. पाटोदा) येथील ह.भ.प. राधाताई सानप, ह.भ.प. नाना महाराज कदम, ह.भ.प. सुरेश महाराज जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. श्रद्धांजलीनंतर संत-महंतांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनिताताई पवार यांची भेट घेऊन त्यांनाही सांत्वन केले.

### BMC मधील कार्यालयावरून राजकीय वाद

# नैऋत्य दिशेच्या प्रवेशद्वारामुळे शिंदे गटाचा नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुंबई महापालिकेत नव्याने झालेल्या राजकीय घडामोडींमध्ये पक्षांना कार्यालयांचे वाटप करण्यात आले असताना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने देऊ केलेले कार्यालय नाकारल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. या कार्यालयाच्या प्रवेशद्वाराची दिशा नैऋत्य असल्याने ते अपशकुनी ठरू शकते, अशी चर्चा शिंदे गटात रंगली आणि अखेरीस हे कार्यालय स्वीकारण्यास नकार देण्यात आला.

मुंबई महापालिकेची निवडणूक महायुतीने जिंकल्यानंतर सत्तास्थापनेची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरल्यानंतर महापौरपदासाठी रितू तावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली असून, उपमहापौरपद शिंदे गटाच्या शिवसेनेच्या वाट्याला आले आहे. उपमहापौरपदासाठी संजय वर्णी यांची निवड करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेत पक्षनिहाय कार्यालयांचे वाटप करण्यात येत आहे.

याच प्रक्रियेदरम्यान शिंदे गटाला देण्यात आलेल्या कार्यालयाबाबत अंतर्गत चर्चा सुरू झाली. वास्तूशास्त्रानुसार नैऋत्य दिशेला असलेले प्रवेशद्वार दुर्भाग्याचे लक्षण मानले जाते, अशी भूमिका काही नेत्यांनी मांडल्याने हे कार्यालय नाकारण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे हेच कार्यालय पूर्वी काँग्रेसच्या ताब्यात होते. काँग्रेसची सध्याची घसरती राजकीय स्थितीही या निर्णयामागे कारणीभूत ठरल्याचे बोलले जात आहे.

कार्यालय वाटपाच्या प्रक्रियेत इतर पक्षांनाही जागा देण्यात आल्या आहेत. शिवसेनेचे जुने कार्यालय विभागून त्यातील ३० टक्के भाग शिंदे गटाला, तर ७० टक्के भाग ठाकरे गटाला देण्यात आला आहे. २०१७ मध्ये देण्यात आलेले कार्यालय पुन्हा भाजपकडेच ठेवण्यात आले आहे. कार्यालय क्रमांक ४ मनसेला, क्रमांक ५ AIMIM ला देण्यात आले असून, क्रमांक ७ काँग्रेसकडे आहे. क्रमांक ८ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट तसेच समाजवादी पक्षाला संयुक्तपणे जागा देण्यात आली आहे. महापौर व उपमहापौर निवडीनंतर मुंबईच्या विकासासाठी महायुती जोमाने कामाला लागेल, असा विश्वास सत्ताधारी नेत्यांकडून व्यक्त केला जात असताना कार्यालय वाटपाच्या मुद्द्यावरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

शिंदे गटाच्या या निर्णयामुळे वास्तूशास्त्राचा राजकारणातील प्रभाव पुन्हा एकदा चर्चेत आला असून, पुढील काळात त्यांना पर्यायी कार्यालय देण्याबाबत प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शरद पवारांच्या राज्यसभा उमेदवारीवर राजकीय हालचाली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्यातील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांत राजकीय घडामोडींना वेग आला असून विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. या पार्श्वभूमीवर पवार कुटुंबीयांच्या भेटीगाठी वाढल्या असल्याचे दिसत आहे. तसेच पार्थ पवार राज्यसभेवर जाण्याची शक्यता व्यक्त होत असताना, शरद पवार पुन्हा राज्यसभा निवडणूक लढवतील का, याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

या चर्चांना चालना देत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी "शरद पवार यांची पुन्हा राज्यसभा निवडणूक लढवण्याची इच्छा आहे का?" असा सवाल उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, खासदार संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावर महाविकास आघाडीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होईल. शरद पवार यांचे वयोमान, ज्येष्ठत्व आणि इंडिया आघाडीतील नेतृत्व लक्षात घेता यावर निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यापूर्वी संजय राऊत यांनी शरद पवार यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यास त्यांना निवडून आणण्याइतकी मते महाविकास आघाडीकडे असल्याचा विश्वास व्यक्त केला होता. या सर्व घडामोडींमुळे राष्ट्रवादीच्या भविष्यातील राजकीय दिशा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

### मजबूत नेतृत्व, निर्णयक्षमता आणि लोकशाही संवादाची गरज



**भारताच्या आधुनिक राजकारणात नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी आणि चर्चेचा विषय राहिले आहे. गेल्या पंचवीस वर्षांत त्यांनी स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय स्तरापर्यंत सातत्याने राजकीय यश मिळवले आहे.**

भारतीय राजकारणात नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व गेल्या पंचवीस वर्षांत अत्यंत प्रभावी ठरले आहे. संघटनात्मक पातळीवरील कार्यापासून ते देशाच्या पंतप्रधानपदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा सातत्य, रणनीती आणि आत्मविश्वास यांचा संगम मानला जातो. निवडणुका जिंकण्याची त्यांची क्षमता, पक्षयंत्रणेवर असलेली पकड आणि प्रशासनातील हस्तक्षेप यांमुळे ते भारतीय राजकारणातील प्रमुख नेत्यांपैकी एक म्हणून ओळखले जातात.

मोदी यांच्या नेतृत्वाची एक महत्त्वाची बाजू म्हणजे निर्णयक्षमता. गुजरातचे मुख्यमंत्री असताना आणि नंतर पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. कलम ३७० रद्द करणे, तीन तलाकविरोधी कायदा लागू करणे, पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देणे, डिजिटल इंडिया, जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या उपक्रमांद्वारे त्यांनी शासनाच्या कामकाजाला वेग दिला. समर्थकांच्या मते, अशा निर्णयांमुळे शासन अधिक परिणामकारक झाले आणि देशाच्या विकासाला चालना मिळाली.

तसेच, मोदी यांच्या वक्तृत्वशैलीने आणि सार्वजनिक संवाद कौशल्याने त्यांना मोठा जनाधार मिळवून दिला आहे. जनसभांमधील प्रभावी भाषणे, रेडिओवरील "मन की बात"सारख्या कार्यक्रमांद्वारे थेट नागरिकांशी संपर्क साधण्याची त्यांची पद्धत त्यांच्या नेतृत्वशैलीचा भाग बनली आहे. यामुळे त्यांनी स्वतःची एक ठाम, निर्णायक आणि कामकाजकेंद्रित नेता अशी प्रतिमा निर्माण केली आहे.

मात्र, लोकशाही व्यवस्थेत मजबूत नेतृत्वाबरोबरच खुला आणि सातत्यपूर्ण संवादही अत्यावश्यक असतो. संसद ही सरकार आणि विरोधक यांच्यातील विचारविनिमयाची सर्वोच्च संस्था आहे. निर्णय घेण्याइतकेच त्या निर्णयांवर चर्चा होणे, प्रश्नांची उत्तरे देणे आणि आवश्यक तेथे स्पष्टीकरण देणे ही लोकशाहीची अपेक्षित प्रक्रिया आहे. यामुळे शासनाच्या कामकाजात पारदर्शकता वाढते आणि जनतेचा विश्वास दृढ होतो.

मोदी यांच्या नेतृत्वशैलीवर टीका करणारे असे म्हणतात की काही प्रसंगी त्यांनी खुल्या, अनियोजित संवादापेक्षा नियंत्रित माध्यमांचा वापर अधिक केला आहे. पत्रकार परिषदांचे प्रमाण कमी असल्याची किंवा संसदीय चर्चांमध्ये अधिक सहभाग अपेक्षित असल्याची टीका अधूनमधून पुढे येते. दुसरीकडे, समर्थकांचा युक्तिवाद असा आहे की सततच्या राजकीय वादांपेक्षा धोरणांची अंमलबजावणी आणि प्रशासनिक कार्यक्षमतेवर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, स्पष्ट बहुमत आणि ठाम नेतृत्वामुळे निर्णय प्रक्रियेत गती येते.

या दोन भिन्न दृष्टिकोनांतून एक व्यापक वास्तव समोर येते—लोकशाहीत प्रभावी नेतृत्व आणि उत्तरदायित्व यांचा संतुलित समन्वय आवश्यक असतो. इतिहासातील अनेक यशस्वी नेत्यांनी कठोर निर्णय घेतले, पण त्याचवेळी विरोधी मतांना ऐकण्याची आणि सार्वजनिक चर्चेला सामोरे जाण्याची तयारी ठेवली. यामुळे शासनावरील विश्वास अधिक बळकट होतो.

आजच्या भारतात केंद्र आणि अनेक राज्यांमध्ये सत्ताधारी पक्षाचे बळकटीकरण झाले असले, तरी घटनात्मक संस्था, न्यायव्यवस्था, माध्यमे आणि विरोधी पक्ष यांची सक्रिय भूमिका लोकशाहीला सक्षम ठेवण्यासाठी महत्त्वाची ठरते. सरकारकडून घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक निर्णयावर सकारात्मक किंवा नकारात्मक प्रतिक्रिया येणे स्वाभाविक आहे; परंतु त्या प्रतिक्रियांना संस्थात्मक चौकटीत उत्तर देण्याची प्रणाली मजबूत असणे गरजेचे आहे.

शेवटी, नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हे मजबूत राजकीय व्यवस्थापन, निर्णयक्षमता आणि जनसंपर्क यांचे उदाहरण म्हणून पाहिले जाऊ शकते. त्याचवेळी, लोकशाहीची गुणवत्ता वाढवण्यासाठी खुला संवाद, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. प्रभावी नेतृत्वाची खरी कसोटी केवळ धाडसी निर्णयांत नसून विविध मतांना सामावून घेत पुढे जाण्याच्या क्षमतेत असते. असा समतोल राखला गेला, तर भारतीय लोकशाही अधिक परिपक्व, विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक बनू शकते.न

# न्यायालयातील 'दिदी' आणि मतदार याद्यांवरील वाद!

पश्चिम बंगालच्या राजकारणात ममता बॅनर्जी या नेहमीच आक्रमक, संघर्षशील आणि लोकाभिमुख नेतृत्वाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जातात. सिंगूरमधील टाटा कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पाविरोधात त्यांनी केलेले २६ दिवसांचे उपोषण, राज्यात सत्ताबदल घडवून आणणारी त्यांची जनआंदोलनात्मक भूमिका, तसेच सीबीआय कारवाईच्या निषेधार्थ कोलकात्यात रात्रभर रस्त्यावर बसून केलेला विरोध—या सर्व घटनांमुळे त्यांची संघर्षशील प्रतिमा जनमानसात ठळकपणे उमटली आहे. परंतु अलीकडे सर्वोच्च न्यायालयात स्वतःच्याच याचिकेवर उभे राहून स्वतःच युक्तिवाद करणाऱ्या ममता बॅनर्जी यांचे एक वेगळेच रूप देशाने पाहिले.

भारतीय राजकीय इतिहासात मुख्यमंत्री पदावर असताना स्वतः न्यायालयात बाजू मांडण्याची उदाहरणे फारच कमी आहेत. दिल्लीच्या तत्कालीन मुख्यमंत्री शीला दीक्षित यांनी प्रदूषण कमी करण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात आपली भूमिका स्पष्ट केली होती, तर दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी ईडीच्या अटकेनंतर जामिनासाठी न्यायालयात स्वतःची बाजू मांडली होती. मात्र, ममता बॅनर्जी यांच्या बाबतीत विशेषत्व असे की, त्या स्वतःच याचिकाकर्त्या होत्या आणि त्यांनी स्वतःच न्यायालयात युक्तिवाद केला. या अर्थाने न्यायालयात अशील आणि वकील अशी दुहेरी भूमिका पार पाडणाऱ्या त्या पहिल्या मुख्यमंत्री ठरल्या. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमध्ये विधानसभेची निवडणूक जवळ येत असताना मतदार याद्यांच्या सखोल फेरतपासणीवरून निर्माण झालेला वाद महत्त्वाचा ठरतो. निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा यादीनुसार लाखो मतदारांची नावे मृत्यू, पत्ता बदल किंवा अनुपस्थिती यांसारख्या कारणांनी वगळण्यात आली. तसेच मोठ्या प्रमाणावर नावांमध्ये विसंगती आढळल्याचे आयोगाने नमूद केले. या निर्णयामुळे मतदारांच्या मोठ्या गटाचे मतदानाधिकार बाधित होऊ शकतात, अशी भीती तृणमूल काँग्रेसने व्यक्त केली.

> » सर्वोच्च न्यायालयात त्यांनी 'मला बोलण्याची परवानगी द्या' अशी विनंती करत आपली बाजू मांडली आणि त्यांना सुमारे वीस मिनिटांचा वेळ देण्यात आला. कायद्याचे शिक्षण घेतलेल्या ममता बॅनर्जी यांनी सामान्य नागरिकाच्या भूमिकेतून मतदार याद्यांतील त्रुटींविषयी आपले मुद्दे मांडले. समाजमाध्यमांवरून निर्देश देणाऱ्या निवडणूक आयोगावर त्यांनी टीका करत त्याला 'व्हॉट्सअॅप कमिशन' अशी उपमा दिली.



ममता बॅनर्जी यांच्या मते, मूळ बंगाली नावांचे इंग्रजीत भाषांतर करताना अनेक तांत्रिक चुका झाल्या आहेत. विशेषतः महिलांच्या नावांमध्ये विवाहानंतर होणाऱ्या बदलांमुळे गोंधळ निर्माण झाला असल्याचा त्यांनी आरोप केला. तसेच मतदार याद्यांच्या फेरतपासणीसाठी केंद्र सरकार आणि इतर राज्यांतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितले.

दुसरीकडे, निवडणूक आयोगाच्या बाजूने असा युक्तिवाद करण्यात आला की, राज्य सरकारकडून आवश्यक त्या अधिकाऱ्यांची उपलब्धता न झाल्यामुळे बाहेरील निरीक्षक नेमावे लागले. तांत्रिक त्रुटी असल्यास त्या दुरुस्त करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने तांत्रिक चुका दुरुस्त करण्याचे निर्देश देत, केवळ अशा त्रुटींमुळे मतदारांची नावे वगळली जाणार नाहीत, असा दिलासा दिला. अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतरच या वादाचा निकाल कोणाच्या बाजूने लागतो हे स्पष्ट होईल. या घटनेला राजकीय रंगही मिळाला आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेस या प्रकरणाचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करेल, असे विश्लेषकांचे मत आहे. दुसरीकडे, भाजपने ममता बॅनर्जी यांची न्यायालयातील उपस्थिती ही केवळ राजकीय नाट्यमयता असल्याचा आरोप केला आहे. अशा प्रकारे निवडणूकपूर्व वातावरणात प्रत्येक कृतीचे राजकीय अर्थ लावले जात आहेत. वास्तविक, मतदार याद्यांवरील वाद हा केवळ पश्चिम बंगालपुरता मर्यादित नाही. बिहार आणि तमिळनाडू यांसारख्या राज्यांमध्येही अशाच प्रकारच्या तक्रारी यापूर्वी पुढे आल्या आहेत. मतदार याद्यांची अचूकता आणि पारदर्शकता ही निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेसाठी अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे अशा वादांमुळे निवडणूक आयोगासारख्या संविधानिक संस्थेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे ही चिंतेची बाब ठरते. लोकशाही व्यवस्थेत निवडणूक आयोगासारख्या संस्थांवर जनतेचा विश्वास टिकवणे अत्यावश्यक आहे. मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्यासाठी तांत्रिक सुधारणा, पारदर्शक प्रक्रिया आणि सर्व पक्षांचा सहभाग आवश्यक ठरतो. त्याचवेळी राजकीय पक्षांनीही या प्रक्रियेचा वापर केवळ राजकीय लाभासाठी न करता मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी करणे गरजेचे आहे. ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात स्वतःची बाजू मांडणे ही घटना त्यांच्या राजकीय शैलीतील वेगळेपण दर्शवते. संघर्षशील नेतृत्वाची प्रतिमा जपत त्यांनी न्यायालयीन प्रक्रियेचा मार्ग स्वीकारला, ही लोकशाही व्यवस्थेतील संस्थांवर असलेल्या विश्वासाचीच एक झलक म्हणता येईल. मात्र अंतिमतः या संपूर्ण वादातून एकच प्रश्न ठळकपणे पुढे येतो—निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि सर्वसमावेशक राहील का? याचे उत्तर अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतरच स्पष्ट होईल. परंतु या घटनेने एक गोष्ट अधोरेखित केली आहे की, लोकशाहीत मतदारांचा हक्क सर्वोच्च आहे आणि त्या हक्काच्या संरक्षणासाठी राजकीय नेतृत्व, निवडणूक आयोग आणि न्यायव्यवस्था या तिन्ही संस्थांनी परस्पर संतुलन राखणे आवश्यक आहे.

# दहावी-बारावी परीक्षांसाठी परीक्षा केंद्रांभोवती मनाई आदेश

## १० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान १०० मीटर परिसरात जमावबंदी; नियम मोडल्यास कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी-बारावी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी महत्त्वाचा निर्णय घेत परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात मनाई आदेश लागू केले आहेत. हा आदेश १० फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजल्यापासून १८ मार्च रोजी रात्री ८ वाजेपर्यंत पुणे ग्रामीण जिल्ह्यात लागू राहणार आहे.



या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी, नियुक्त अधिकारी-कर्मचारी, पोलीस व सुरक्षा यंत्रणा यांच्याशिवाय इतर कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच दोन किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अंतर्गत कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत असल्याने परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात, कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी हा आदेश जारी करण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी-आयएसडी बूथ, फॅक्स, छायाप्रती केंद्रे, ई-मेल व इंटरनेट सुविधा तात्पुरत्या बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मोबाइल, वायरलेस सेट, रेडिओ, कॅलक्युलेटर, लॅपटॉप आदी इलेक्ट्रॉनिक साधने केंद्रात किंवा परिसरात वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

राज्य मंडळातर्फे 'कॉपीमुक्त अभियान' राबवण्यात येणार असून सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य करण्यात आली आहे. ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही उपलब्ध नाही, तेथील कर्मचाऱ्यांची अदलाबदल केली जाणार आहे. याशिवाय ड्रोनद्वारे देखरेख, पोलिस बंदोबस्त, भरारी पथके आणि बैठी पथके तैनात ठेवून गैरप्रकारांना आळा घालण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

# पुणे-मुंबई तिसरी-चौथी मार्गिका रखडली; सकाळी गाड्यांचा सहा तासांचा खंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** अनेक वर्षांपासून चर्चेत असलेला पुणे-मुंबई दरम्यान तिसरी व चौथी रेल्वे मार्गिका उभारण्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. अर्थसंकल्पात घोषणाही झाल्यानंतर प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, असा प्रश्न प्रवासी व रेल्वे प्रवासी संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.

या दोन मार्गिका कार्यान्वित झाल्यास मार्गावरील रेल्वे गाड्यांची संख्या वाढवणे शक्य होणार असून, लोकल सेवेलाही मोठा फायदा होऊ शकतो. परिणामी रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. वाढती प्रवासी संख्या आणि कार्यालयीन ये-जा लक्षात घेता सरकारने या प्रकल्पाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याची मागणी होत आहे.

दरम्यान, पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या सकाळच्या प्रमुख गाड्या साडेनऊ वाजेपर्यंतच उपलब्ध असल्याने त्यानंतर तब्बल सहा तास गाड्यांचा खंड पडतो. या काळात बाहेरून येणाऱ्या काही गाड्या असल्या तरी त्या बहुतांश वेळा पूर्ण क्षमतेने भरलेल्या असतात. त्यामुळे प्रवाशांना तिकीट मिळवणे आणि वेळेत प्रवास करणे कठीण जाते.

या पार्श्वभूमीवर सकाळी साडेनऊनंतर किमान दर तासाला एक गाडी सुरू करण्याची मागणी नियमित प्रवासी व प्रवासी संघटनांकडून करण्यात येत आहे.

# म्हाडाच्या पुणे मंडळाची ४,१८६ घरांची सोडत १० फेब्रुवारीला; महिन्यांचा विलंब संपणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** तांत्रिक अडचणी आणि आचारसंहितेमुळे मागील अनेक महिन्यांपासून रखडलेली म्हाडाच्या पुणे मंडळाची ४,१८६ घरांची सोडत अखेर मार्गी लागणार आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता ९ फेब्रुवारीला संपताच १० फेब्रुवारी रोजी सोडत काढण्याचा मुहूर्त निश्चित करण्यात आला आहे.

२० टक्के सर्वसमावेशक योजना आणि १५ टक्के एकात्मिक योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या या घरांसाठी सप्टेंबरमध्ये नोंदणी, अर्जविक्री व स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र तांत्रिक अडचणी आणि प्रतिसादाच्या कारणास्तव नोंदणीला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. परिणामी ऑक्टोबरमध्ये अपेक्षित असलेली सोडत डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली गेली. या ४,१८६ घरांसाठी तब्बल दोन लाख १५ हजार अर्ज दाखल झाल्याने पात्र अर्जदारांची छाननी करण्यास मोठा विलंब झाला. डिसेंबरमध्ये सोडत काढण्याचे प्रयत्न झाले, मात्र छाननी पूर्ण न झाल्याने ते शक्य झाले नाही. त्यानंतर लागू झालेल्या आचारसंहितेमुळे प्रक्रिया पुन्हा थांबली.

नोव्हेंबरपासून सोडतीचा निकाल रखडल्याने दोन लाखांहून अधिक अर्जदारांमध्ये नाराजी पसरली असून म्हाडावर टीका होत होती. आता आचारसंहिता संपताच मंडळाने सोडतीची तयारी पूर्ण केली असून अर्जदारांना दिलासा मिळणार आहे.

# मिळकतकर वाढीचा प्रस्ताव स्थायी समितीत रखडला

## प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह; विकासकामांवरील वाढता खर्च यामधील तफावत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिकेला मिळणारे उत्पन्न आणि विविध विकासकामांवरील वाढता खर्च यामधील तफावत भरून काढण्यासाठी प्रशासनाने मिळकतकरात १० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला होता. मात्र शुक्रवारी झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव मंजुरीसाठी न ठेवता पुढे ढकलण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.




गेल्या दहा वर्षांपासून महापालिकेच्या मिळकतकरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे आगामी २०२६-२७ आर्थिक वर्षासाठी मिळकतकरात दहा टक्के वाढ करण्याची गरज असल्याचे स्पष्टीकरण देत महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव मांडला होता. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रशासक म्हणून करवाढ का आवश्यक आहे, याबाबत सविस्तर मांडणी केली होती. तथापि, त्यांच्याच अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय पुढे ढकलण्यात आल्याने या निर्णयामागील कारणांविषयी चर्चा सुरू झाली आहे. आयुक्त प्रशासक म्हणून कारभार पाहत असताना त्यांच्याकडूनच प्रस्तावाला तत्काळ मान्यता मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रस्ताव प्रलंबित राहिल्याने प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सध्या महापालिका आयुक्त नवल किशोर राम हेच प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. चार वर्षांपूर्वी महापालिकेच्या सभागृहाची मुदत संपल्यानंतर राज्य सरकारने प्रशासक नेमला असून सर्व निर्णयप्रक्रिया त्यांच्या माध्यमातूनच राबवली जाते. विविध समित्यांच्या बैठका घेऊन महत्त्वाचे आर्थिक व प्रशासकीय निर्णय घेतले जात आहेत. दरम्यान, चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर महापालिकेची निवडणूक नुकतीच पार पडली असून भाजपने सर्वाधिक जागा मिळवत पुन्हा एकदा सत्ता मिळवली आहे. मात्र नव्या महापौरांची निवड व सर्वसाधारण सभा होईपर्यंत महापालिकेचा कारभार प्रशासकांच्या हातीच राहणार आहे. त्यामुळे मिळकतकर वाढीच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय कधी होणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# एक्सप्रेस-वेवरील कोंडी 'भयानक'; उपाययोजनांसाठी मोहोळ ॲक्शन मोडवर

## मुंबई-पुणे मार्गावर विशेष यंत्रणा उभारण्याचे आश्वासन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई-पुणे एक्सप्रेस-वेवरील अलीकडील भीषण वाहतूक कोंडीची दखल घेत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे आश्वासन दिले आहे. "ही कोंडी अत्यंत भयानक होती. नागरिक मोठ्या प्रमाणात अडकले आणि त्रस्त झाले," असे ते म्हणाले.



वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (वॅमनीकॉम) येथे आयोजित पदवीदान समारंभानंतर पत्रकारांशी बोलताना मोहोळ यांनी सांगितले की, कोंडीच्या काळात ते सातत्याने पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक आणि संबंधित यंत्रणांच्या संपर्कात होते. "सगळी यंत्रणा घटनास्थळी कार्यरत होती. मात्र भविष्यात असा प्रकार होऊ नये यासाठी प्रत्येक ठिकाणी आवश्यक सुविधा आणि समन्वय यंत्रणा उपलब्ध असणे गरजेचे आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. लोकप्रतिनिधी म्हणून ही जबाबदारी स्वीकारत अशा परिस्थिती टाळण्यासाठी ठोस प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी नमूद केले.

### 'सहकारातून समृद्धी'वर भर

कार्यक्रमादरम्यान मोहोळ यांनी देशातील सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणावरही भाष्य केले. "भारताची अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकावर असून लवकरच तिसऱ्या स्थानावर जाण्याची क्षमता आहे. देशात साडेआठ लाखांहून अधिक सहकारी संस्था असून ३० कोटींपेक्षा जास्त नागरिक या क्षेत्राशी जोडलेले आहेत," असे त्यांनी सांगितले. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली असून 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेअंतर्गत कृषी व्यवसायात नवे बदल घडत आहेत. आगामी काळात सहकार क्षेत्रासाठी किमान १७ लाख प्रशिक्षित तरुणांची गरज भासेल, असेही त्यांनी नमूद केले.

> **'दुःखद प्रसंगाचे राजकारण टाळावे'**
>
> ● अजितदादांच्या निधनाबाबत बोलताना मोहोळ यांनी या विषयाचे राजकारण करू नये, असे आवाहन केले. "मुख्यमंत्री स्वतः लक्ष घालत असून केंद्रीय तपास यंत्रणा चौकशी करत आहेत. ब्लॅक बॉक्सचा डेटा तपासला जाईल आणि अहवाल आल्यानंतरच निष्कर्ष काढावेत," असे त्यांनी सांगितले. "अजितदादांसारखा मोठा नेता गमावणे हे राज्य आणि पुणे जिल्ह्यासाठी मोठे नुकसान आहे. अशा दुःखद प्रसंगी कोणतीही अटकळ किंवा आरोप-प्रत्यारोप टाळणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

### पुण्याच्या विकासाचा रोडमॅप

पुण्याला देशातील सर्वोत्तम शहर बनवण्याचा निर्धार व्यक्त करत मोहोळ म्हणाले की, समान पाणीपुरवठा योजना, वाहतूक कोंडी, नदी सुधारणा प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक वाहतूक या महत्त्वाच्या मुद्द्यांवर समन्वयाने काम केले जाईल. शहर, उपनगर आणि समाविष्ट गावांचा एकत्रित विचार करून संतुलित विकास साधला जाईल, असे त्यांनी सांगितले. महापौरपदासाठी मिळालेल्या जनतेच्या पाठिंब्याबद्दल पुणेकरांचे आभार मानत त्यांच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी काम करू, असेही त्यांनी आश्वासन दिले.

# 'मकोका' कारवाईनंतर पसार सराईत जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) गुन्हा दाखल झाल्यानंतर चार महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या सराईताला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. चंद्रशेखर उर्फ शेखर विठोबा ठोंबरे (वय २८, रा. कात्रज) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. ठोंबरे व त्याच्या साथीदारांविरुद्ध गेल्या वर्षी मकोका अंतर्गत कारवाई झाली होती. कारवाईनंतर तो फरार झाला होता. तो सिंहगड रस्त्यावरील वडगाव बुद्रुक परिसरात येणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला जेरबंद केले. ही कारवाई पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते व सहायक आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दरम्यान, घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर वाहनांची तोडफोड करून दहशत माजविणाऱ्या प्रकरणी राजरत्न कुलदीप खरे (वय २०, रा. मुंढवा) याला अटक करण्यात आली असून तीन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले आहे. ३१ जानेवारी रोजी आरोपींनी दुचाकीवरून येत शस्त्रे उगारून एका दुकानात व परिसरातील वाहनांची तोडफोड केली होती.

शहरात वाहन तोडफोडीच्या घटना वाढत असल्याने अशा सराईतांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. प्राथमिक तपासात बहुतांश गुन्ह्यांत अल्पवयीनांचा सहभाग आढळत असून दहशत माजविण्याच्या उद्देशाने ही कृत्ये होत असल्याचे समोर आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पुणे पोलिसांचा धडाका; वाहनचोरी टोळीचा पर्दाफाश, 13 दुचाकी

**पिंपरी-चिंचवड :** उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने वाहनचोरी करणाऱ्या टोळीला अटक करत मोठी कारवाई केली. पोलिसांनी दोन आरोपींना बेड्या ठोकून एकूण 13 चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या. जप्त वाहनांची अंदाजे किंमत सुमारे 5 लाख 50 हजार रुपये आहे. या कारवाईमुळे परिसरातील वाहनचोरीचे सहा गुन्हे उघडकीस आले असून टोळीचा कारभार उधळला आहे. पुढील तपास पोलीस करत असून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### दुचाकी चोरी टोळी जेरबंद; 13 मोटारसायकली जप्त

**पिंपरी-चिंचवड :** औद्योगिक परिसरात वाढलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी कारवाई करत निलेश मंडलीक व संदीप सोनवणे या दोघांना अटक केली. सीसीटीव्ही व गोपनीय माहितीच्या आधारे आंबेठाण चौकातून त्यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी चाकण एमआयडीसी परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली.

### थेऊरमध्ये फॉर्च्यूनरची दुचाकीला धडक

**थेऊर :** थेऊर काकडे मळा–नायगाव रस्त्यावर शुक्रवारी रात्री भरधाव फॉर्च्यूनर (क्रमांक 7771)ने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने अक्षय कुंजीर, प्रणय कांबळे व शुभम थोरे जखमी झाले. प्रणय कांबळे यांची प्रकृती गंभीर असून त्यांना विश्वराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर चालक मदत न करता पसार झाला. या प्रकरणी प्रणय कांबळे यांच्या फिर्यादीवरून लोणी काळभोर पोलिस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

---

**जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर टप्प्याटप्प्याने प्रक्रिया; 31 मार्चपर्यंत समायोजन पूर्ण करण्याचे निर्देश**

# अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी सुधारित कार्यपद्धती जाहीर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयांतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी शिक्षण विभागाने सुधारित कार्यपद्धती जाहीर केली आहे. सुधारित संचमान्यता निकषानुसार 23 ऑक्टोबर 2025 रोजीच्या पटावर नोंद असलेल्या आधार-वैध विद्यार्थी संख्येच्या आधारे डिसेंबर 2025 मध्ये संबंधित माहिती शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

2024-25 च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समायोजन प्रक्रियेला यापूर्वी स्थगिती होती. मात्र, उच्च न्यायालयाने सर्व याचिका निकाली काढल्याने 2025-26 च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार रिक्त जागा (संवर्ग, विषय व इयत्तानिहाय) तसेच अतिरिक्त कर्मचाऱ्यांची तात्पुरती यादी 13 फेब्रुवारीला जाहीर करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर समायोजनाची कार्यवाही 3 मार्चपर्यंत पूर्ण करणे आवश्यक असून, त्यानंतर अंतिम यादी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे 10 मार्चपूर्वी सादर करावी लागणार आहे. या प्रक्रियेत प्रथम तात्पुरती यादी जाहीर करून 20 फेब्रुवारीपर्यंत आक्षेप-हरकती स्वीकारल्या जातील. 25 फेब्रुवारीला अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल आणि समुपदेशनाद्वारे कर्मचाऱ्यांचे समायोजन केले जाईल. विभागस्तरावरही टप्प्याटप्प्याने प्रक्रिया राबवली जाणार आहे. 6 मार्चला विभागीय यादी जाहीर होईल. 10 ते 16 मार्चदरम्यान आक्षेप-हरकती स्वीकारून 20 मार्चला अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर 25 मार्चपर्यंत समुपदेशनाद्वारे विभागस्तरावरील समायोजन पूर्ण केले जाईल. उर्वरित रिक्त पदांचा तपशील व अतिरिक्त कर्मचाऱ्यांची यादी 31 मार्चपर्यंत राज्यस्तरावर सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शिक्षण संचालकांनी दिलेल्या सूचनांनुसार अनुदान प्रकार व व्यवस्थापन प्रकारानुसार समान असणाऱ्या रिक्त पदांवर अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन विभागस्तरावर 25 मार्चपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावरील समायोजन 3 मार्चपर्यंत पूर्ण झाल्यानंतर समायोजित कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान मूळ शाळेतून देऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित देयक मूळ शाळेतून दिल्यास जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या सुधारित कार्यपद्धतीमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेली समायोजन प्रक्रिया वेगाने मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन

---

# आंबेगाव तालुक्यात उत्साह, तरीही शांततेत मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या मतदानाला उत्साहपूर्ण, तरीही शांततेत सुरुवात झाली. महिला तसेच तरुण-तरुणींनी मोठ्या संख्येने मतदान केंद्रांवर हजेरी लावून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला.

घोडेगाव पेठ, अवसरी बुद्रुक, निरगुडसर, पारगाव, कळंब-चांडोली, शिनोली-बोरघर या गटांतील गावागावांत सकाळपासूनच मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. तालुक्याच्या पूर्व भागातील गावडेवाडी, खडकवाडी, लोणी, धामणी, मांदळेवाडी, वडगावपीर, जारकरवाडी, वाळूंजनगर, शिरदाळे, पहाडधरा व पोंदेवाडी येथे नागरिकांनी उन्हाच्या आधीच मतदान करून आपला हक्क बजावला.

माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मूळ गावी निरगुडसर येथे अनुसया महिला उन्नती केंद्राच्या अध्यक्षा किरणताई दिलीप वळसे पाटील यांनी मतदान करून नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले. मतदान केंद्रांवर शिस्तबद्ध वातावरण राखत प्रशासनाने आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या.

**+ गावागावांत सकाळपासून रांगा; महिलां-तरुणांचा सक्रिय सहभाग**

**नवरदेवाने दिले मतदानाला प्राधान्य**

खडकवाडी (ता. आंबेगाव) येथे लग्नाचा मुहूर्त असतानाही नवरदेव प्रमोद बाबाजी डोके यांनी वऱ्हाडी मंडळींसह नवरदेवाच्या पोशाखात प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर जाऊन प्रथम मतदानाचा हक्क बजावला. त्यांच्या या कृतीचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले.

धामणी येथे कार्यकर्त्यांनी मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी साध्या पद्धतीनेच अल्पोपहार घेत काम सुरू ठेवले, तर मेंगडेवाडी येथे उन्हातही कार्यकर्ते मतदारांना स्लीप देत मदत करताना दिसले.

---

# १०६ वर्षांच्या आजींचा लोकशाहीला सलाम; मतदानाचा हक्क बजावत प्रेरणादायी संदेश

**पिंपळवंडी (ता. जुन्नर) येथील सोनाबाई दांगट यांचा आदर्श**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदान हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचा संदेश देत पिंपळवंडी (दांगट वाडी), ता. जुन्नर येथील १०६ वर्षांच्या सोनाबाई सबाजी दांगट यांनी उत्साहाने मतदानाचा हक्क बजावला. वाढत्या वयामुळे येणाऱ्या अडचणींवर मात करत त्यांनी मतदान केंद्रावर उपस्थित राहून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श ठेवला.

मतदान ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून देशाच्या भविष्यासाठीची जबाबदारी आहे, असे मत व्यक्त करत सोनाबाई दांगट यांनी तरुण पिढीला विशेष आवाहन केले. अनेकदा उदासीनतेमुळे मतदान टाळले जाते; मात्र लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मत अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आजींच्या या कृतीमुळे मतदान केंद्रावर उपस्थित नागरिक, अधिकारी आणि तरुण मतदार प्रेरित झाले. वय, आजारपण किंवा वेळेची अडचण ही कारणे मतदान टाळण्यासाठी पुरेशी नसतात, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या सहभागामुळे परिसरात मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

१०६ वर्षांच्या वयातही मतदानाचा हक्क बजावत सोनाबाई दांगट यांनी लोकशाहीप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित केली. त्यांच्या या कृतीमुळे आगामी निवडणुकांमध्ये अधिकाधिक नागरिकांनी मतदानासाठी पुढे यावे, अशी अपेक्षा स्थानिक प्रशासन व नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

---

# लग्नाआधी लोकशाहीला मानाचा मुजरा

**नवरीने बजावला मतदानाचा हक्क; आंबेगाव तालुक्यातील नागापूर मतदान केंद्रावर प्रेरणादायी क्षण**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आंबेगाव :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील नागापूर येथील मतदान केंद्र क्रमांक ११/३५ येथे एक प्रेरणादायी घटना घडली. विवाह बंधनात अडकण्याच्या काही तासांपूर्वीच नवरीने मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला.

लग्नाच्या गडबडीतही लोकशाहीप्रती कर्तव्याची जाणीव ठेवत पारंपरिक वेशात आलेल्या या नवरीने मतदानासाठी रांगेत उभे राहून मतदान केले. तिच्या या कृतीमुळे उपस्थित मतदार आणि निवडणूक कर्मचारी यांच्यात कौतुकाची भावना निर्माण झाली.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान अशा प्रकारच्या घटनांमुळे मतदानाचे महत्त्व अधोरेखित होत असून, नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत मतदानाचा हक्क बजावावा, असा सकारात्मक संदेश या घटनेतून मिळाला. स्थानिक नागरिकांनीही नवरीच्या या लोकशाहीप्रेमी भूमिकेचे स्वागत करत तिचे अभिनंदन केले.

प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रावर सुरळीत व शांततेत मतदान प्रक्रिया पार पडत असल्याची माहिती देण्यात आली. या प्रेरणादायी घटनेमुळे नागापूर परिसरात मतदानाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

---



**मंचर :** जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती आंबेगाव सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने पोखरी येथील पुणे जिल्ह्यातील एकमेव ज्येष्ठ नागरिक श्रीमती सीताबाई गोविंद आढारी वय १०७ वर्षे यांनी मतदानाचा हक्क बजावला व तरुण पिढीला प्रोत्साहित करून मतदानाची जागरूकता वाढवली.

# जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद–पंचायत समिती मतदान शांततेत पार

**पहिल्या चार तासांत मतदानाचा टक्का वाढला; संध्याकाळपर्यंत ६५–६७ टक्के मतदान**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शनिवारी (दि. ७) सकाळी ७.३० वाजता मतदानास संथ गतीने मात्र शांततेत सुरुवात झाली. तालुक्यातील ८ जिल्हा परिषद गट आणि १६ पंचायत समिती गणांमध्ये मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवण्यास सुरुवात केली.

सकाळी ७.३० ते ९.३० या दोन तासांत सुमारे ७.५ टक्के मतदान झाले. यामध्ये एकूण १,५५,८४६ पुरुष मतदारांपैकी १५,७३० पुरुषांनी, तर १,५१,४०९ स्त्री मतदारांपैकी ७,०९८ महिलांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर सकाळी ९.३० ते ११.३० या कालावधीत मतदानाचा वेग वाढत टक्केवारी १४.२ टक्क्यांनी वाढून एकूण २१.७ टक्के मतदान नोंदले गेले. या वेळेपर्यंत सुमारे ६४,७२५ मतदारांनी मतदानात सहभाग घेतला.

दुपारी ३.३० पर्यंत एकूण ४० ते ४२ टक्के मतदान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, सायंकाळी ५.३० पर्यंत ६५ ते ६७ टक्के मतदान होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना केल्या होत्या. नारायणगाव, मढ, पिंपरी पेंढार, पारगाव तर्फे आळे आणि राजुरी येथे भरत असलेले आठवडे बाजार शेतकरी व व्यापाऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बंद ठेवण्यात आले. या निवडणुकीसाठी तालुक्यात एकूण १ लाख ५५ हजार ८४६ पुरुष, १ लाख ५२ हजार ४०९ स्त्री आणि ५ इतर अशा मिळून ३ लाख ७ हजार २६० मतदारांची नोंद आहे. मतदानासाठी ३६६ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वप्निल मोरे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुनील शेळके यांनी दिली. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान केंद्राध्यक्ष, विविध स्तरांवरील मतदान अधिकारी, शिपाई कर्मचारी आणि पोलिस कर्मचारी अशा एकूण २,३९६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ३५ क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे.

---

# ९५ वर्षांच्या लहानुबाई कडलक यांनी व्हीलचेअरवरून मतदानाचा हक्क बजावला



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ :** लोकशाही ही केवळ मतदान यंत्रांवर उमटलेल्या बोटांच्या ठशांवर नव्हे, तर नागरिकांच्या जाणीव, कर्तव्यभावना आणि सक्रिय सहभागावर उभी असते, याचे जिवंत उदाहरण पाबळ येथील लहानुबाई सुदाम कडलक (वय ९५) यांनी आपल्या कृतीतून समाजासमोर ठेवले. वयोमानामुळे हालचाल मर्यादित असतानाही आणि चालणे जवळजवळ अशक्य असतानाही लहानुबाईंनी कोणत्याही अडचणींचा बाऊ न करता व्हीलचेअरवर बसून मतदान केंद्र गाठले आणि आपला घटनात्मक मतदानाचा हक्क बजावला.

"मी मतदान करणारच" या ठाम भूमिकेतून त्यांनी आपल्या कुटुंबीयांच्या मदतीने मतदान केंद्रावर पोहोचत लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवला. त्यांच्या या जिद्दीने आणि कर्तव्यनिष्ठेने उपस्थित नागरिक, मतदान कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच प्रथमच मतदान करणाऱ्या तरुण मतदारांवर सकारात्मक प्रभाव पडला. मतदान केंद्रावर लहानुबाई पोहोचताच अनेकांनी त्यांच्या या कृतीचे मनापासून कौतुक केले. काही नागरिकांनी "आज खऱ्या अर्थाने लोकशाही जिवंत असल्याचे पाहायला मिळाले," अशा भावना व्यक्त केल्या.

**+ वयोमानावर मात करत जिद्दीने बजावला घटनात्मक अधिकार**

आजच्या घडीला अनेक तरुण वेळेअभावी किंवा उदासीनतेमुळे मतदानाकडे पाठ फिरवतात. अशा परिस्थितीत ९५ वर्षांच्या वृद्ध महिलेने दाखवलेली ही जिद्द संपूर्ण गावासाठी, विशेषत: तरुण पिढीसाठी प्रेरणादायी संदेश ठरली आहे. वय, आजार किंवा अन्य अडचणी या लोकशाही कर्तव्यापुढे कधीही अडथळा ठरू शकत नाहीत, हे लहानुबाईंनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

पाबळ गावात घडलेली ही घटना केवळ एका वृद्ध महिलेच्या मतदानापुरती मर्यादित नसून ती लोकशाही मूल्यांची, जबाबदारीची आणि सजग नागरिकत्वाची साक्ष देणारी ठरली आहे. लहानुबाई कडलक यांचा हा आदर्श पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरत असून प्रत्येक नागरिकाने मतदानाच्या दिवशी घराबाहेर पडून आपला हक्क बजावावा, असा ठाम संदेश त्यांनी दिला.

---

**कायदेविषयक शिबिरातून महिलांचे हक्क, बालविवाह प्रतिबंध आणि कायदेशीर मदतीची माहिती**

# जुन्नरमध्ये 'बालविवाहमुक्त भारत' साठी सखोल जनजागृती मोहीम यशस्वी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** वनविभाग जुन्नर यांच्या पुढाकारातून 'बालविवाहमुक्त भारत' या उद्दिष्टासाठी राबविण्यात आलेली १०० दिवसांची सखोल जनजागृती मोहीम उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडली. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रमानुसार आयोजित या कायदेविषयक शिबिराचे आयोजन शिवराय संकुल, बारव (जुन्नर) येथे करण्यात आले.

जिल्हा न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. दिवाणी व फौजदारी न्यायाधीश सपना घुले यांच्या अध्यक्षतेखाली शिबिर संपन्न झाले. महिला व बालविकास मंत्रालयाच्या सहकार्याने ४ डिसेंबर २०२५ पासून सुरू झालेल्या या मोहिमेत बालविवाह प्रतिबंध, महिलांचे हक्क आणि कायदेविषयक जागरूकता यावर विशेष भर देण्यात आला.

शिबिरात जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनच्या उपाध्यक्षा निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, तबस्सुम पठाण, सलमा सय्यद, रणजित भगत, विनोद खंडागळे, मंजिरी कोल्हे, राजेंद्र कोल्हे, समकित नानावटी, करण खंडागळे, तय्यब पठाण यांसह तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे, परिविक्षाधीन उपवनसंरक्षक लोकेश पाटील, वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि महिला वन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश सपना घुले यांनी कामाच्या ठिकाणी महिलांवरील अत्याचार रोखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येकाला जगण्याचा व स्वातंत्र्याचा अधिकार असून, त्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. या कायद्यांचा दुरुपयोग न करता त्यांचा सकारात्मक हेतूने वापर करण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. निलीमा शेरकर यांनी 'घर घर में न्याय' आणि राष्ट्रीय लोकअदालतीचा प्रसार यावर माहिती दिली. तबस्सुम पठाण यांनी बालविवाहविरोधी जागरूकता व मुलींवरील हिंसाचार निर्मूलनाचे महत्त्व स्पष्ट केले. सलमा सय्यद यांनी कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाविरोधातील कायदेशीर उपाय सांगितले, तर रणजित भगत यांनी पोलीस ठाणे, कारागृह आणि संबंधित ठिकाणी नागरिकांचे कायदेशीर हक्क याविषयी माहिती दिली.

विनोद खंडागळे यांनी आदिवासींचे हक्क व मोफत कायदेशीर मदत योजनांवर प्रकाश टाकला, तर मंजिरी कोल्हे यांनी मानवी-वन्यजीव संघर्षग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रशांत मोरतळे यांनी केले, सूत्रसंचालन वनसंरक्षक स्मिता राजहंस यांनी केले, तर आभार वनपाल सोनल भालेराव यांनी मानले. १०० दिवसांची ही जनजागृती मोहीम व कायदेविषयक शिबिर मोठ्या उत्साहात पार पडून बालविवाह निर्मूलनासाठी समाजात सकारात्मक संदेश देण्यात यश मिळाले.

## सारांश वृत्त

### राज्यात केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा

पुणे : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईव्दारे आज शनिवार (दि. ७) आणि रविवार (दि. ८ फेब्रुवारी) या दोन दिवशी सीटीईटी (केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा) होणार आहे. संबंधित परीक्षेला बसणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी सीबीएसईने हॉलतिकीट उपलब्ध केले आहे. या परीक्षेसाठी अर्ज केलेले उमेदवार अधिकृत संकेतस्थळ HTTPS://CTET.NIC.IN ला भेट देऊन त्यांचे हॉलतिकीट डाऊनलोड करू शकतात.

---

### शिक्षण अध्यापन पदविका परीक्षेचा निकाल ७४.२२ टक्के

पुणे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या डी.एल.एड. (शिक्षण अध्यापन पदविका परीक्षा) डिसेंबर २०२५ परीक्षेचे आयोजन ९ ते १७ डिसेंबरदरम्यान केले होते. या परीक्षेचा निकाल परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून यामध्ये एकूण ७४.२२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. डी.एल.एड. परीक्षेच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षेत सर्व माध्यमांच्या एकूण ३ हजार ६०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यांपैकी ३ हजार ५६८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २ हजार ६७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

---

### रेल्वे अधिकाऱ्याची फसवणूक

मुंबई : शेअर ट्रेडिंगच्या बहाण्याने मध्य रेल्वेच्या एका अधिकाऱ्याची सुमारे पावणेअकरा लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तक्रारदार भांडुप परिसरात राहात असून मध्य रेल्वेत वरिष्ठ अभियंता म्हणून काम करतात. गेल्या वर्षी त्यांना अज्ञात व्यक्तीने एका खासगी कंपनीच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये अॅड केले होते.

## राज्यात १९ विद्यार्थ्यांवर कारवाईची शिफारस

# प्रवेशासाठी बोगस 'जात'!

## ३२ जणांकडे आढळले बनावट वैधता प्रमाणपत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळावा यासाठी ३२ जणांनी चक्क बोगस जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच १९ विद्यार्थ्यांकडे प्रवेश घेतेवेळी प्रमाणपत्रच नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**




आदिवासी विकास विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेत या सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची तसेच सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची शिफारस राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाला (सीईटी सेल) केली आहे.अनुसूचित जमातीतील (एसटी) गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा अधिकार हिरावून त्यांच्याजागी ३२ जणांनी बोगस प्रमाणपत्राच्या आधारे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविल्याचे आदिवासी विकास विभागाने केलेल्या छाननीत उघडकीस आले.

त्यात नागपूर विभागातील सर्वाधिक २३ जणांचा समावेश आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतेवेळी मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांचे जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. २०२५-२६ शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र तपासण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेऊन छाननी सुरू केली. त्यात ३२ विद्यार्थ्यांनी बोगस प्रमाणपत्राच्या आधारे अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्याचे स्पष्ट झाले. तर इतर १९ विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी वैधता प्रमाणपत्रच सादर केलेले नसल्याचे आढळून आले.

### ई-ट्राइब पोर्टलचा आधार

बोगस प्रमाणपत्रांना भविष्यात चाप लागावा यासाठी आदिवासी विकास हे विभागाकडून 'ई-ट्राइब' ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात आले असून त्या माध्यमातून आता विद्यार्थ्यांना त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता मिळविणे शक्य होणार आहे. या पोर्टलविषयी माहिती देताना विभागाचे सचिव विजय वाघमारे म्हणाले की, 'तंत्रज्ञानाचा वापर करून बोगस प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येत आहे. एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हक्क कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही. तसेच या पोर्टलच्या माध्यमातून याआधीच्या वैधता प्रमाणपत्रांची छाननीही करण्यात येणार आहे'.

### अधिकाऱ्यांचीही चौकशी

नियमांमध्ये कोणतीही तरतूद नसताना या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश कसे देण्यात आले, याची चौकशी करून संबंधित अधिकारी तसेच शैक्षणिक संस्थांची जबाबदारीनिश्चित करून त्यांच्यावर कारवाई करावी व त्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाला द्यावी, अशी सूचनाही सीईटी सेलला देण्यात आली आहे.

# देशात विमानांमध्ये बिघाडांचे सत्र सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** जानेवारी २०२५ पासून देशातील सहा प्रमुख विमान कंपन्यांच्या एकूण ७५४ विमानांची तांत्रिक तपासणी करण्यात आली. यापैकी ३७७ विमानांमध्ये वारंवार बिघाड झाल्याचे समोर आले. विशेष म्हणजे हा बिघाड दुरुस्त केल्यानंतरही पुन्हा तोच दोष झाल्याचे समोर आले आहे, अशी माहिती केंद्र सरकारने संसदेत दिली.

एअर इंडियाच्या २६७ विमानांपैकी १९१ विमानांमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड आढळला. इंडिगोच्या ४०५ विमानांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १४८ विमानांमध्ये या वर्षी ३ फेब्रुवारीपर्यंत रिपिटेटिव्ह डिफेक्ट (एकच बिघाड वारंवार) आढळला.

लोकसभेत नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले की, डीजीसीएने गेल्या वर्षी सुरक्षेबाबत मोठ्या प्रमाणावर तपासणी केली. या दरम्यान ३८९० सर्व्हिलन्स इन्स्पेक्शन, ५६ ऑडिट, ४९२ रॅम्प चेक आणि ८४ परदेशी विमानांची तपासणी करण्यात आली. ८७४ स्पॉट चेक आणि ५५० नाईट सर्व्हिलन्सदेखील करण्यात आले.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सरकारी आकडेवारी जाहीर झाल्यानंतर सांगितले की, आम्ही अत्यंत सावधगिरी बाळगून आमच्या संपूर्ण ताफ्यात तपासणी केली आहे, त्यामुळे संख्या जास्त आहे. एअर इंडियाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, विमानात वेगवेगळ्या प्रकारच्या उपकरणांची तपासणी केली जाते. उपकरणांच्या प्राधान्यानुसार किंवा तातडीनुसार त्यांना अ, ब, क आणि ड सेगमेंटमध्ये विभागले आहे. अधिकाऱ्यांच्या मते, एअर इंडियाच्या बाबतीत, बहुतेक समस्या श्रेणी ड मध्ये आहेत, ज्यात सीट, ट्रे टेबल, स्क्रीन (सीटच्या मागे) इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. या विमानांच्या सुरक्षिततेशी संबंधित नाहीत.

# परिवहन मंत्र्यांनी फेटाळला भाडेवाढ प्रस्ताव

## सरनाईक यांच्याकडून अधिकाऱ्यांची कानउघाडणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** बसेस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाके वेगाने फिरतील, असा संदेश देण्याची गरज आहे. त्यासाठी अगोदर एसटीच्या वेळा पाळा, अशा शब्दांत अधिकाऱ्यांची कानउघाडणी करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटीची भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला. इंधन व गाडीच्या सुट्या भागांची दरवाढ झाल्याने एसटी महामंडळाने दोन टक्के दरवाढीचा प्रस्ताव तयार केला . होता. यासंदर्भात शुक्रवारी र मंत्रालयातील दालनात मंत्री प्रताप न सरनाईक यांनी घेतलेल्या आढावा न बैठकीत महामंडळाचा दरवाढीचा प्रस्ताव फेटाळून लावत प्रशासनाला वक्तशीरपणाला सर्वोच्च प्राधान्य न देण्याचे निर्देश दिले. किफायतशीर दर, सुरक्षित प्रवास आणि शासनाच्या विविध सवलतींमुळे प्रवाशांचा ओघ र वाढत असताना सेवेत वक्तशीरपणा नसेल तर ही वाढ टिकणार नाही. प्रत्येक वेळेवर सुटणारी बस म्हणजे वाढत्या उत्पन्नाकडे जाणारे एक पाऊल आहे. वक्तशीरपणाचा थेट संबंध महसुलाशी आहे. त्यामुळे प्रवाशांना ताटकळत ठेवणे आणि वारंवार होणाऱ्या उशिरामुळे प्रवाशांना पर्याय शोधायला भाग पाडण्यासारखे असून, परिणामी हक्काचा प्रवासी खासगी पर्यायांकडे वळतो, याकडेही मंत्री सरनाईक यांनी लक्ष वेधले. त्यामुळे दैनंदिन प्रवासात बसेस उशिरा सुटणे, रस्त्यात बंद पडणे किंवा अचानक फेऱ्या रद्द होणे, अशा तक्रारी सोडविण्यासाठी आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करून प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी, असे निर्देशही सरनाईक यांनी दिले. बैठकीला एसटी महामंडळाचे

## विनोद तावडे महाराष्ट्रातून राज्यसभेवर?

मुंबई : महाराष्ट्रातून राज्यसभेवर पाठवावयाच्या नेत्यांत ज्येष्ठ भाजप नेते विनोद तावडे यांचा समावेश असू शकेल. बिहार विधानसभा निवडणूक तसेच भाजपच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत गेल्या ५-६ वर्षांपासून महाराष्ट्राबाहेर राहिलेले तावडे भारतीय जनता पक्षासाठी महत्त्वाचे नेते ठरले आहेत. २०१९ साली विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी नाकारल्यानंतर पक्षनिर्णयाचा कोणताही अधिक्षेप न करता केंद्रात बस्तान उभे करणाऱ्या तावडे यांना राज्यसभेवर पाठवणे उचित ठरेल, असे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांचे मत आहे. २०१९ साली त्यांना लढायची संधी का दिली नाही हे गूढ आहे.

# लाडक्या बहिणींना दिलासा

## ३१ मार्चपर्यंत केवायसीची संधी; रखडलेले हप्ते जमा होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यभरात अनेक लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नसल्याने काही ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज भरताना अनेक महिलांनी ई-केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. मात्र, आता या महिलंना दिलासा मिळणार आहे. महिला व बाल विकास विभागाने ई-केवायसीचे पोर्टल पुन्हा सुरू केले असून, ई-केवायसी दुरुस्ती आता ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे. गेल्या काही दिवसांपासून ई केवायसीचे पोर्टल बंद असल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. यामुळे लाडक्या बहिणींनी राज्यातील अनेक भागांमध्ये आक्रोश व्यक्त करत मोर्चे काढले होते. याची गंभीर दखल घेत राज्य महिला व बालविकास विभागाने आदेश काढून पोर्टल सुरू केले आहे. या निर्णयामुळे लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे. योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसीद्वारे आधार प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, ही प्रक्रिया पार पाडताना अनेक महिलांकडून कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबतचा पर्याय निवडताना तांत्रिक चूक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. कुटुंबातील कोणी सदस्य सरकारी

विभाग, मंडळ किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेत नियमित/कंत्राटी कर्मचारी आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना चुकीचा पर्याय निवडला गेल्यामुळे अनेक पात्र महिलांच्या अर्जाबाबत संभ्रम निर्माण झाला होता. या त्रुटींमुळे लाभार्थी महिलांच्या पात्रतेची खात्री करण्यासाठी शासनाने २० जानेवारी रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, ही पडताळणी प्रक्रिया अधिक जलद आणि सुटसुटीत व्हावी, अशी मागणी लाभार्थी महिला आणि क्षेत्रीय कार्यालयांकडून सातत्याने केली जात होती. ननन

# रितू तावडे मुंबईच्या महापौर तर घाडी उपमहापौर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मनपाच्या महापौरपदी भाजपकडून रितू तावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुंबईच्या उपमहापौरपदी शिंदेसेना शिंदे गटाकडून संजय शंकर घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. पुढील सव्वा वर्षांसाठी घाडी उपमहापौर असणार आहेत. भाजपकडून रितू तावडे आणि शीतल गंभीर यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा होती, पण रितू तावडे यांनी बाजी मारली. मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहे. 11 फेब्रुवारी मुंबई मनपा महापौर निवड होणार आहे. रितू तावडे या भाजपच्या मुंबईमधील पहिल्या महिला महापौर असणार आहेत. मुंबईची महापौरपदी निवड झाली असली तरी मुंबईची सेवक म्हणून काम करणार आहे. महापौरपद कोणाला मिळणार याची उत्सुकता सर्वांना होती. मुंबईच्या हितासाठी सर्व नगरसेक निवडून गेले आहेत. सभागृहाची गरिमा ठेवून मुंबईच्या हितासाठी पक्षभेद विसरुन निर्मळ आणि प्रामाणिक काम करावं अशी माझी अपेक्षा आहे, असं मुंबईच्या नव्या महापौरपदाच्या उमेदवार रितू तावडे म्हणाल्या.



नागपूरच्या महापौर पदी निवड झाल्यावर नितातार्इ ठाकरे यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# नागपूरच्या महापौरपदी भाजपच्या नीता ठाकरे विराजमान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर :** उपराजधानीच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या महापौरपदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. भाजपच्या उमेदवार नीता ठाकरे यांनी १०४ मते मिळवून काँग्रेसच्या उमेदवाराचा मोठ्या फरकाने पराभव केला. रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात शुक्रवारी, ६ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साही वातावरणात ही निवडणूक प्रक्रिया पार पडली.

या निवडणुकीत नीता ठाकरे यांना विजयासाठी आवश्यक असणाऱ्या आकड्यापेक्षा अधिक मते मिळाली. भाजपचे स्वतःचे १०२ नगरसेवक असून त्यांना शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या प्रत्येकी एका सदस्याने मतदान केले. त्यामुळे ठाकरे यांच्या पारड्यात एकूण १०४ मते पडली. दुसरीकडे, काँग्रेसच्या उमेदवार स्नेहल ठाकरे यांना पक्षाची ३४ आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाची २ अशी एकूण ३६ मते मिळाली. विशेष म्हणजे, एमआयएम (६), मुस्लिम लीग (४) आणि बहुजन समाज पक्षाचा १ अशा एकूण ११ सदस्यांनी तटस्थ राहण्याची भूमिका घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. महापौर निवडीचा निकाल जाहीर होताच उपमहापौर पदासाठीची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली. सभागृहातील संख्याबळाचे समीकरण स्पष्ट असल्याने भाजपच्या उमेदवार लीलाताई हाथीबेड यांची निवड आता केवळ औपचारिकता उरली आहे. या निवडीनंतर महापालिकेच्या सर्वात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'स्थायी समिती'च्या १६ सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया पार पडणार आहे.

## सोने व तांबे खाणकामासाठी पाकिस्तानने दिली परवानगी

# बलुचिस्तानातील खजिन्यावर अमेरिकेची नजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इस्लामाबाद :** पाकिस्तानने अमेरिकेसोबत सुमारे १.३ अब्ज डॉलर्सचा करार करत बलुचिस्तान प्रांतात सोने व तांबे खाणकामासाठी परवानगी दिली आहे. या करारामुळे पाकिस्तानच्या संवेदनशील आणि अस्थिर मानल्या जाणाऱ्या बलुचिस्तानमधील नैसर्गिक संपत्तीवर अमेरिकेचा प्रभाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधीच चीनच्या प्रकल्पांना स्थानिक विरोध असताना, आता अमेरिकेच्या थेट प्रवेशामुळे या भागातील राजकीय व सुरक्षा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होण्याची चिन्हे आहेत.

हा करार रेको डिक या महत्त्वाकांक्षी खाण प्रकल्पाशी संबंधित असून, तो पाकिस्तान-इराण सीमेवर स्थित आहे. सुमारे ७ अब्ज डॉलर्सच्या या प्रकल्पाअंतर्गत २०२८ च्या अखेरीस सोने उत्खनन सुरू होण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प कॅनडास्थित बॅरिक मायनिंग कंपनी विकसित करत असून, त्यात पाकिस्तानी सरकारी संस्थांचा सहभाग आहे. प्रकल्पासाठीचा निधी अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँक ऑफ अमेरिका (एक्झिम) कडून मिळणार आहे. अमेरिका या माध्यमातून पाकिस्तानसोबत आर्थिक सहकार्य वाढवत असल्याचा दावा करत असली, तरी प्रत्यक्षात बलुचिस्तानच्या खनिज संपत्तीवर नियंत्रण मिळवण्याचा हा प्रयत्न असल्याचे मत विश्लेषक मांडत आहेत.

बॅरिक मायनिंगचा या प्रकल्पात ५० टक्के वाटा असून, तीन पाकिस्तानी सरकारी कंपन्यांचा २५ टक्के आणि बलुचिस्तान सरकारचा उर्वरित २५ टक्के हिस्सा आहे. मात्र, बलुचिस्तानमध्ये सक्रिय असलेले बलुच बंडखोर गट या प्रकल्पाकडे संशयाने पाहत आहेत. गेल्या काही वर्षांत त्यांनी पाकिस्तानी प्रतिष्ठानांवर तसेच चिनी नागरिकांवर हल्ले केले आहेत. अशा पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या उपस्थितीमुळे सुरक्षेचे प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. तांब्याची वाहतूक सुलभ करण्यासाठी बलुचिस्तान ते कराची रेल्वे मार्गाच्या विस्ताराची योजना देखील या प्रकल्पाचा भाग आहे.

पाकिस्तान सरकारला रेको डिक प्रकल्पातून मोठ्या उत्पन्नाची अपेक्षा आहे. मात्र, स्थानिक बलुच समाजात नाराजी वाढत आहे. प्रशासन, राजकारण आणि लष्करात पंजाबी वर्चस्व असल्याची तक्रार करत, नैसर्गिक संसाधनांच्या शोषणाचा लाभ स्थानिकांना मिळणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे. चीन, पाकिस्तान आणि आता अमेरिकेच्या वाढत्या उपस्थितीला बलुचिस्तानातील जनता आणि बंडखोर गट कशी प्रतिक्रिया देतात, यावर या प्रकल्पाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

# इस्लामाबादमध्ये बॉम्बस्फोट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद शुक्रवारी दुपारी भीषण बॉम्बस्फोटाने हादरली. शहरातील तरलाई भागातील एका इमामवाड्यात जुम्याच्या नमाजदरम्यान झालेल्या स्फोटात किमान १५ जणांचा मृत्यू झाला असून ८० हून अधिक भाविक जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारी नमाजसाठी इमामवाड्यात मोठी गर्दी जमली असताना अचानक जोरदार स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की इमामवाड्यासह आसपासच्या इमारतींना हादरे बसले. परिसरात एकच गोंधळ उडाला. स्फोटानंतर काही क्षणांतच पोलिस आणि सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसर सील केला.

घटनेची माहिती मिळताच 'रेस्क्यू ११२२'चे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना रुग्णालयात हलवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. घटनास्थळी फॉरेन्सिक पथक आणि बॉम्ब निकामी करणाऱ्या तुकड्यांनाही पाचारण करण्यात आले आहे.

पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे आणीबाणी घोषित करण्यात आली असून इमर्जन्सी, ऑर्थोपेडिक, बर्न सेंटर आणि न्यूरोलॉजी विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. पोलिसांनी सांगितले की, हा आत्मघाती हल्ला होता की आयईडी स्फोट, याबाबत स्पष्टता नाही. तपास सुरू असून सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे तपासले जात आहेत. कोणत्याही दहशतवादी संघटनेने याची जबाबदारी स्वीकारलेली नाही.